ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख २७ ऑगस्ट, १९५८ अंक १५

## विविध माहिती

**काम करतांना मृत्यु आल्यास**—केरळ सरकारने असा हुकूम काढला आहे कीं, एखाद्या पोलिसाला आपलें काम करीत असतांना मारण्यांत आलें तर अगर आपलें काम करीत असतां अप्रत्यक्ष रीत्या मृत्यू आला तर त्याच्या विधवा बायकोला दरमहा किमान २० रुपये जादा पेन्शन देण्यांत यावें. ह्या हुकमाची अमलबजावणी ऑगस्टच्या १ तारखेपासून करण्यांत आली आहे.

**नवीन विद्युत्-केंद्राचें उद्घाटन**— दामोदर-खोरे योजनेमधील मैथॉन येथील विद्युत्-केंद्राचें उद्घाटन बिहारचे मुख्य मंत्री श्री. श्रीकृष्ण सिंह ह्यांनीं केलें. केंद्र बांधण्यास सुमारें ४॥ कोटि रुपये खर्च आला. भारतामधील व आशिआंतील तें पहिलें भूमिगत केंद्र आहे. तें बांधण्यास दोन वर्षांचा काळ लागला.

**सिमेंटची निर्यात**—चालू वर्षी भारतानें २ लाख टन सिमेंट निर्यात करण्याचें ठरविलें आहे. त्यापैकी २५,००० टन सिमेंट निर्यात करण्याचे करार झाले असून आणखी ७५,००० टनांच्या निर्यातीचा करार लवकरच करण्यांत येणार आहे. सिमेंटच्या निर्यातीनें दुर्लभ परदेशीय चलन मिळतें. सिमेंट पाकिस्तान, सीलोन, सिंगापूर व हाँगकाँग ह्या ठिकाणीं पाठविण्यांत येतें.

**गवळयांची सहकारी संस्था**—पालघर तालुक्यांतील गवळी लोकांनीं दुधाच्या उत्पादनासाठी व त्याची विक्री करण्यासाठी आपली सहकारी संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. सध्या पालघर व त्याच्या आसपासच्या गांवांतून शेंकडों मण दूध रोज मुंबईला पाठविण्यांत येतें. संस्था स्थापन झाल्यावर दूध गोळा करण्याचें व पाठविण्याचें काम तिच्यातर्फे करण्यांत येईल.

**वीज-बोर्डाचें कर्ज**— मद्रास वीज बोर्डानें २ कोटि रुपयांचे कर्जरोखे विक्रीस काढले आहेत. १०० रु. च्या कर्जरोख्याची किंमत ९९ रुपये ठेवण्यांत आली आहे. कर्जाची हमी राज्य-सरकारनें घेतली असून त्यावर ४॥ टक्क्यानें व्याज देण्यांत येईल. राज्यांतील विजेचें उत्पादन १०० टक्क्यांनीं वाढविण्यासाठी त्याचा उपयोग करण्यांत येईल. कर्ज १ सप्टेंबरला खुलें होईल.

**भारतीय चित्रपटाला पहिलें बक्षीस**—ब्रिटिश कोलंबिआंतील व्हँनकुअर येथें भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांत ‘पथेर पांचाली’ ह्या भारतीय चित्रपटाला पहिलें बक्षीस देण्यांत आलें. २८ देशांच्याकडून सुमारें ३०० चित्रपट स्पर्धेसाठी आले होते. महोत्सवांत आलेल्या चित्रपटांचें २०,००० प्रेक्षकांनीं स्वागत केलें.

**१९६० मधील ऑलिंपिक सामने**— १९६० मधील ऑलिंपिक सामने रोममध्यें भरविण्यांत येणार आहेत. ह्या सामन्यासाठी येणाऱ्या खेळाडूंसाठी एक खास वसाहत बांधण्यांत येणार आहे. वसाहतीसाठी सुमारें ३७॥ लाख पौंड खर्च करण्याचें इटलीच्या सार्वजनिक बांधकाम खात्यानें ठरविलें आहे.

**साखरेच्या उत्पादन खर्चाची चौकशी**—इंडिअन शुगर मिल्स असोसिएशननें भारत सरकारला अशी सूचना केली आहे कीं, साखरेच्या उत्पादनाच्या खर्चाची चौकशी करण्यांत यावी. निरनिराळया कारखान्यांचा उत्पादन खर्च वेगवेगळा असल्यानें नियंत्रित दरानें साखर विकतांना कांहीं साखर कारखान्यांना ती तोट्यांत विकावी लागत आहे, असें असोसिएशनचें म्हणणें आहे.

**कामगारांना कर्जे**—सोलापूर स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल बराच काळपर्यंत बंद असल्यामुळें गिरणींत काम करणाऱ्या कामगारांची कुचंबणा झाली होती. त्यांना अडचणींत मदत करण्यासाठी मुंबई सरकारनें त्यांच्या प्रॉव्हिडंट फंडांतून कर्जे दिलीं आहेत. सुमारें ६,००० कामगारांना मिळून ८ लाख रुपये देण्यांत आले आहेत.

**म्हैसूर राज्यांत सिमेंटचा कारखाना**— म्हैसूर राज्यांत खाजगी भांडवलाचा एक सिमेंटचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता १ लाख टनांची असेल व त्यासाठी ३ कोटि रुपयांचें भांडवल लागेल. कारखान्याच्या उभारणीसाठी अमेरिकन कंपनीची मदत घेण्यांत येणार आहे. उत्पादन १९६० मध्यें सुरू होईल.

**कांचा बनविण्याचा कारखाना**—दुर्बिणी, शास्त्रीय उपकरणें, इत्यादि वस्तू बनविण्यास लागणारा कारखाना भारतांत काढण्यासाठी रशिअन तंत्रज्ञांचें एक मंडळ आलें होतें. मंडळानें कारखान्यासाठी सोयीच्या जागांची पहाणी पुरी केली असून तें आपला अहवाल ८–९ महिन्यांत मध्यवर्ती सरकारला सादर करील.

**साखरेच्या निर्यातीसाठी कायदा**—भारतामधील साखरेच्या उत्पादनापैकी कांहीं भाग निर्यात करून परदेशीय चलन मिळविण्यास परवानगी देणारा कायदा लोकसभेंत प्रविष्ट करण्यांत आला आहे. राष्ट्राध्यक्षांनीं ह्याच कारणासाठी काढलेला वटहुकूम आतां अर्थातच रद्द होणार आहे.

**दक्षिण भारतीय भाषांचें शिक्षण**—विद्यापीठ अनुदान मंडळानें दक्षिण भारतांत प्रचलित असलेल्या भाषा उत्तर भारतामधील विद्यापीठांतून शिकविण्यासाठी मदतीची योजना आंखली आहे. अलीगढ विद्यापीठाला ४१,००० रुपये व बनारस विद्यापीठाला १८,००० रुपये देण्यांत येणार आहेत

### फक्त पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या सभासदांकरितां

## सूचना

पुणें सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक लि. ची ४१ वी वार्षिक साधारण सभा रविवार दि. १४ सप्टेंबर १९५८ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालय हायस्कूलचे सभागृहांत भरणार आहे.

सदर सभेमध्यें खालील कामें करण्यांत येतील:—

(१) दि. १५-९-५७ रोजीं झालेल्या वार्षिक साधारण सभेचा व दिनांक २७-४-१९५८ रोजीं भरलेल्या विशेष साधारण सभेचा वृत्तान्त वाचून कायम करणें.

(२) दि. ३० जून १९५८ रोजीं संपणाऱ्या सालांतील बँकेच्या कामकाजाचा अहवाल व नफा-वांटणी पत्रकासह ताळेबंदाचा विचार करणें.

(३) बोर्डाच्या निकालाविरुद्ध कांहीं तक्रारी असल्यास त्या ऐकून त्यांचा निकाल करणें.

(४) सन १९५८-५९ सालाकरितां नेमावयाच्या बँकेच्या हिशेब तपासनिसांचें वेतन ठरविणें.

(५) पुढील सालाकरितां बँकेचे डायरेक्टर्स, चेअरमन व व्हाईस-चेअरमन निवडणें व हिशेब तपासनीस नेमणें.

(६) पोटनियमांत सुचविलेल्या खालील दुरुस्त्यांचा विचार करणें.

(अ) पोटनियम १० (अ) व ३३ मध्यें मा. बोर्डानें सुचविलेल्या व मान्य केलेल्या दुरुस्त्या.

(आ) सहकारी साखर कारखान्यांचे प्रतिनिधींकडून बँकेचे डायरेक्टर बोर्डावर सहकारी साखर कारखान्यांचा प्रत्येकीं एक प्रतिनिधि असण्याबाबत सुचविण्यांत आलेला पोटनियम नवा (जादा).

(७) मा. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं नियमांत केलेल्या खालील दुरुस्त्या पो. नि. नं. ७७ अन्वयें मा. साधारण सभेचे माहितीसाठीं सादर.

१. नोकरीचे नियम नं. ६५ (अ) व नवीन नियम नं. ७७ (ब)

२. शेतीच्या, औद्योगिक व उद्दीम मालाचे तारणावर सोसायट्यां व व्यक्तिशः सभासदांना कर्ज देण्यासंबंधींचे नियमांपैकीं नि. नं. २ मधील दुरुस्ती.

३. सेफ डिपॉझिट लॉकर्स भाड्यानें देण्यासंबंधी नियमापैकी नि. नं. १ मधील दुरुस्ती.

(८) ऐनवेळीं येणाऱ्या विषयांचा मा. अध्यक्ष यांचे परवानगीनें विचार करणें.

वार्षिक सभेचे वेळीं सभासदांस कांहीं माहिती विचारावयाची असल्यास त्यांनीं आपली विचारणा लेखी स्वरूपांत दि. ३१ ऑगस्ट, १९५८ रोजीं दुपारीं ४ वाजणेपूर्वी मुख्य कचेरींत मॅनेजिंग डायरेक्टर यांचेकडे आणून द्यावी.

नवीन सालच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या निवडणुकीकरितां व हिशेबतपासनीसांच्या नेमणुकीकरतां मतें देण्याची वेळ दिनांक १४ सप्टेंबर १९५८ रोजीं सकाळीं ८-३० ते दुपारीं १२ वाजेपर्यंत आहे.

सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

पुणें २
दि. २०-८-१९५८.

बोर्डाचे हुकुमावरून
वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

सरदारगृह

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४



किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. २७ ऑगस्ट, १९५८





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## रूरकेला येथील पोलादाचा कारखाना

रूरकेला येथें बांधण्यांत येत असलेल्या पोलादाच्या कारखान्यांतील पहिली भट्टी १९५८ च्या डिसेंबर महिन्यांत सुरू करण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीचें काम करीत असलेल्या हिंदुस्थान स्टील कंपनीचे रूरकेला येथील डायरेक्टर श्री. एम्. गणपति ह्यांनीं ही माहिती वृत्तपत्रप्रतिनिधींना नुकतीच दिली. कारखान्याला विजेचा पुरवठा करण्यासाठी जें शक्तिकेंद्र उभारण्यांत येत आहे त्याचा एक अवघड भाग नुकताच पुरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं बोलतांना श्री. गणपति म्हणाले कीं, ह्या वीजकेंद्रांतील यंत्रसामुग्री सिमेन्स ह्या जर्मन कंपनीनें तयार केली आहे. कारखान्यासाठी लागणारें अनेक प्रकारचें पोलादाचें सामान सध्यां कलकत्ता बंदरांत येऊन पडलें आहे. त्याचें वजन ३०,००० टनांच्या आसपास आहे. पण, हें सर्व साहित्य रूरकेला येथें येऊन पोचणें अवघीचें काम आहे. कलकत्ता बंदरांत नुकताच झालेला गोदी कामगारांचा संप आणि रूरकेला जवळ बांधण्यांत आलेल्या पुलाची पुरामुळें झालेली नासाडी, ह्या कारणांनीं जरूर ती यंत्रसामुग्री जागेवर पोंचविण्यास ४ आठवडे तरी अधिक लागणार आहेत. प्रत्येक महिन्याला कलकत्तां येथें हजारों टन पोलादी सामान येत आहे. तें सर्व वेळच्या वेळीं रूरकेला येथें पोंचविण्याचें काम सोपें नाहीं. कारखान्यांतील पहिली भट्टी चालू करण्यासाठी १०,००० टन पोलादी सामानाची आवश्यकता आहे. त्यांपैकीं ४,००० टन सामान कलकत्ता बंदरांत अडकून पडलेलें आहे. सध्यां रूरकेला येथें पोलादी सामान घेऊन रोज १०० वाघिणी येतात. ह्या वाघिणीमधून रोज १,५०० टन पोलाद येतें. तथापि, कलकत्ता बंदरांतील संपामुळें सामान पाठविण्याच्या कामीं घोटाळे झाले. जें सामान आधी यावयास पाहिजे होतें त्याच्याऐवजीं दुसरेंच सामान तांतडीनें पाठविण्यांत आलें, त्यामुळेंहि अधिक वेळ लागत आहे.

---

## तेलाच्या उत्पन्नांत अधिक वांट्याची मागणी

इराकमध्यें राज्यक्रांति होऊन नवें प्रजासत्ताक सरकार अधिकारावर आलें आहे. मध्यपूर्वेतील इतर देशांप्रमाणें इराकी सरकारच्या उत्पन्नाचा फार मोठा भाग परदेशी कंपन्यांकडून तेलाच्या उत्पादनावर देण्यांत येणाऱ्या रॉयल्टीपासून मिळतो. खुद्द इराक सरकारच्या एकूण उत्पन्नापैकीं एक तृतीयांश उत्पन्न त्याला ह्याच मार्गानें मिळत असतें. कंपन्यांपासून मिळणाऱ्या रॉयल्टीपासून इराकला दरसाल ८ कोटी पौंड मिळत होते. नवीन सरकार रॉयल्टीमध्यें वाढ करण्यांत यावी असा आग्रह धरणार असल्याची वार्ता आहे. हें उत्पन्न वाढवून घेण्यासाठी तेलाच्या कंपन्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचें अगर त्यांच्याशीं असलेले करारमदार मोडण्याचें कांहीं कारण पडणार नाहीं. इराकमध्यें इराक पेट्रोलिअम कंपनी ही प्रमुख कंपनी असून तिच्याशीं संलग्न अशा इतर कांहीं कंपन्या आहेत. इराकमध्यें राज्यक्रांति होण्यापूर्वीं एकच दिवस सरकारनें कंपनीच्या चालकांकडून कांहीं महत्त्वाचे फेरबदल करवून घेतले होते. पूर्वीच्या करारांप्रमाणें इराकमधील कांहीं भाग सोडून बाकीच्या सर्वच प्रदेशांत तेलासाठी शोध करण्याचा मक्ता कंपनीला देण्यांत आला होता. क्रांति होण्यापूर्वीच्या सरकारच्या अर्थसचिवानें कंपनीकडून संबंधित फरक करण्याचें तत्त्वतः मान्य करून घेतलें होतें. त्यानंतर आणखी वाटाघाटी करून सरकारी तेलसंशोधनासाठीं कोणता प्रदेश ठेवण्यांत यावा तें ठरविण्यांत येणार होतें. इराकच्या प्रदेशापैकीं फारच थोड्या प्रदेशांत आतांपर्यंत तेलाचा शोध करण्यांत आलेला आहे. सरकारी संशोधनाला प्रदेश मोकळा करून घेतल्यानें इराकच्या सरकारला स्वतःच्या मालकीची कंपनी काढतां येईल अगर नव्या कंपनीला आवाहन करतां येईल.

---

## विजेच्या अवजड यंत्रसामुग्रीचा कारखाना

दुर्लभ परदेशी चलनाच्या तुटवड्यामुळें भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत उत्पन्न झालेल्या अडचणी मधून मधून प्रसिद्ध होत असतात. भोपाळ येथें विजेच्या अवजड यंत्रसामुग्रीचा कारखाना काढण्याचा निर्णय भारत सरकारनें जाहीर केलेला होता. पण, कारखान्यासाठी लागणारें परदेशीय चलन उपलब्ध करण्याच्या कामीं कांहीं अडथळे आले होते. आतां हा अडथळा दूर झाला असून कारखान्याची उभारणी निश्चितपणें होणार असें दिसतें. कारखान्याला लागणारी यंत्रसामुग्री पुरविण्याबद्दल ब्रिटनमधील असोसिएटेड इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज आणि भारत सरकार ह्यांच्यांत एक करार करण्यांत आला आहे. कारखान्याची उभारणी टप्प्याटप्प्यानें करण्याचें ठरलें आहे. पैकीं फक्त पहिला टप्पाच दुसऱ्या कार्यक्रमाच्या अवधींत पुरा करण्यांत येणार आहे. ह्या टप्प्यासाठी २१ कोटी रुपये खर्च येणार असून तो १९६० च्या अखेरीस पूर्ण करण्यांत येईल. कारखान्याची उभारणी अशा रीतीनें करण्यांत येणार आहे कीं, प्रत्येक टप्प्यांत कमींत कमी परदेशीय चलन लागून जास्तींत जास्त उत्पादन होईल. कलकत्ता येथील एका कंपनीला कारखान्याच्या तीन इमारती बांधण्याचें कंत्राट देण्यांत आलें आहे. तिन्ही इमारतींना मिळून १·२५ कोटी रुपये खर्च येईल. पहिला टप्पा पूर्ण करण्यासाठी एकूण ५ कोटी रुपयांचें परदेशीय चलन लागेल. पण त्यांपैकीं फक्त १२२ लाख रुपयेच काय ते प्रत्यक्ष खर्च करावे लागतील. उरलेली रक्कम १९६० सालानंतर हप्त्यानें देण्याचें ठरविण्यांत आलें आहे. कारखान्यासाठी लागणारी अनेक प्रकारची यंत्रसामुग्री ब्रिटन व पश्चिम युरोपमधील देश ह्यांच्याकडून घेण्यांत येणार आहे. यंत्रसामुग्री खरेदी करण्याचें काम असोसिएटेड इंडस्ट्रीज करणार आहे. ब्रिटनमधील बँकांच्या एका सिंडिकेटनें यंत्रसामुग्रीसाठी लागणारें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे.

## कर्जांनें तातडीच्या गरजा भागतील, पण पुढें परदेशीं चलनांत देणें फेडावयाचें आहे

### अर्थमंत्र्यांचा आढावा व इशारा

एप्रिल ते जुलै १९५८ या मुदतीपुरतें पाहतां, मार्च १९५८ अखेरीस आपला परकीय चलनाचा सांठा २६७ कोटि रुपयांच्या पौंडी गंगाजळीचा होता. एप्रिल १९५८ च्या प्रारंभीं ब्रिटिश सरकारनें २२ कोटि रुपये दिले. तरीहि, जुलै १९५८ अखेरीस आपली पौंडी गंगाजळी १९३ कोटि रुपयांवर आली. अशा रीतीनें एप्रिल ते जुलै या चार महिन्यांत अंदाजें ७४ कोटि रुपयांची घट झाली.

आपल्या महत्त्वाच्या योजनांसाठी पूर्वी मागण्या नोंदविलेल्या भांडवली मालाच्या मोठ्या रकमा चालू वर्षांत द्यावयाच्या आहेत. खाजगी आणि सरकारी क्षेत्रांत अशा प्रकारें द्यावयाची रक्कम १ एप्रिल, १९५८ रोजीं अंदाजें ८८७ कोटि रुपये होत असून त्यापैकी बरीच रक्कम भांडवली मालासाठी द्यावयाची आहे. यांच्या जोडीस परकीय बाजारपेठांत घसरणीच्या प्रवृत्तीमुळें अलीकडील कांहीं आठवड्यांत आपला निर्यात व्यापारहि घटला आहे. नियोजन मंडळाच्या, 'दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें मूल्यमापन आणि भवितव्य' या प्रबंधांत एप्रिल, १९५८ ते मार्च, १९६१ या मुदतींत आपल्या परकीय चलनाच्या ताळेबंदांत अंदाजें ५०० कोटि रुपयांची तफावत राहील असा अंदाज केलेला होता. निर्यात व्यापारांतील सध्याच्या प्रतिकूल स्थितीचा विचार करून याबाबत तयार केलेल्या ताज्या अंदाजांत असें दिसतें कीं या योजनेच्या शेवटच्या तीन वर्षांत आपणांस ५६० कोटि रुपयांचें परकीय चलन लागेल. अर्थात् गव्हाच्या बाबतींतील आपल्या नित्याच्या बाजाराच्या जबाबदाऱ्या आणि ब्रह्मदेशचा तांदूळ या व्यतिरिक्त जी कांहीं धान्याची आयात आपल्याला करावी लागेल ती अमेरिकेच्या पब्लिक लॉ ४८० खालीं केलेल्या व्यवस्थेनुसार केली जाईल ही गोष्ट येथें गृहीत धरण्यांत आलेली आहे. योजनेच्या गाभ्यांतील कार्यक्रम आणखी ६१९ कोटि रु. खर्चून पूर्ण होतील आणि आपली आर्थिक व्यवस्था सुरक्षितरीत्या टिकविण्याची व्यवस्था होईल, यावरून हा अंदाज आधारलेला आहे. त्याचप्रमाणें योजनेच्या अखेरीस २०० कोटि रु. ची पौंडी गंगाजळी शिल्लक राहील ही गोष्टहि गृहीत धरली आहे. याचा अर्थ असा नाहीं कीं, ही शिल्लक कोणत्याहि वेळीं २०० कोटि रु. पेक्षा कमी होणार नाहीं; इतकेंच नव्हे तर आजच ती २०० कोटि रु. पेक्षा कमी आहे. तथापि शक्य झाल्यास आपण तिसरी पंचवार्षिक योजना किमान इतकी रक्कम शिल्लक ठेवूनच सुरू करावी. १ एप्रिल, १९५८ रोजीं ५६० कोटि रु. च्या तुटीचा अंदाज धरतांना ५१३ कोटि रु. च्या परकीय मदतीचा संपूर्ण विचार झाला होता. त्यानंतर दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन योजनेसाठी आंतरराष्ट्रीय बँकेनें जुलै १९५८ मध्यें आणखी १२ कोटि रु. कर्ज मंजूर केलें आहे.

उरलेली तूट भरून काढण्यासाठींहि आपण सतत प्रयत्न चालविले आहेत. यासाठीच परकीय हुंडणावळ मिळवून देणारीं व्यापारी पिकें, विशेषतः तेलबिया, कोळसा, इत्यादींची निर्यात वाढविणें, नव्या उद्योगधंद्यांची उत्पादनशक्ति वाढविणें, अत्यावश्यक अशा कच्च्या मालाच्या पुरवठ्याची व्यवस्था करणें, निर्यात मालाचा दर्जा वाढविणें, जकाती कमी करणें, निर्यात व्हावयाच्या मालाच्या वाहतुकीस अग्रक्रम देणें, जादा साखरेची तसेंच सिमेंट व पादत्राणें यांची निर्यात करणें, इत्यादि उपाय योजण्यांत येत आहेत. या व यानंतर केल्या जाणाऱ्या उपाययोजनांमुळें आपला निर्यात व्यापार वाढेल. तथापि आंतरराष्ट्रीय व्यापारांतील सध्यांची मंदी व निर्यातीबद्दलचा निराशावादी दृष्टिकोण यांमुळें चालू वर्षांत निर्यातीपासून होणाऱ्या उत्पन्नांत विशेष सुधारणा होणार नाहीं असें वाटतें. आपल्या प्रचलित परिस्थितीबद्दल आपण आंतरराष्ट्रीय संस्थांना आणि आपल्या मित्र-राष्ट्रांना संपूर्ण माहिती पुरवीत आहोंत आणि योग्य प्रकारें आणखी परकीय साह्य मिळविण्याची खटपट चालू आहे. जागतिक बँकेनें, भारताबद्दल आस्था असलेल्या आपल्या सदस्य राष्ट्रांशीं भारताची परकीय चलनविषयक स्थिति आणि त्यास कशा प्रकारें साह्य करतां येईल यासंबंधीं चर्चा करण्यासाठी, वॉशिंग्टन येथें या महिन्याच्या उत्तरार्धांत त्यांची परिषद् बोलावली आहे. या परिषदेस अमेरिका, ब्रिटन, प. जर्मनी आणि जपान या राष्ट्रांनीं उपस्थित राहण्याचें ठरविलें आहे. आंतरराष्ट्रीय नाणें निधीचा प्रतिनिधीहि उपस्थित राहील. आपण या परिषदेंत भाग घेणार नाहीं. तथापि आपल्या परिस्थितीची योग्य माहिती होण्याकरितां जरूर ती आंकडेवारी आपण देऊं. या परिषदेचे निर्णय तावडतोब जाहीर होतील अशी अपेक्षा आपण बाळगूं शकत नाहीं. संबंधित राष्ट्रांनीं योग्य ते निर्णय घ्यावयाचे आहेत.

आंतरराष्ट्रीय संस्थांशीं त्वरेनें वाटाघाटी करतां याव्या म्हणून आर्थिक व्यवहार विभागाचा खास अधिकारी नेमण्यांत आला आहे. तो वॉशिंग्टन येथें असेल. त्याचप्रमाणें ब्रिटनमधील आर्थिक मंत्र्यांच्या कार्यातहि वाढ केली जाईल.

आपण घेत असलेल्या प्रत्येक कर्जानें आपल्या आजच्या तातडीच्या व पुढील काळांतील गरजा भागविल्या जातील हें खरें. परंतु तें त्याचबरोबर आपलें दीर्घ मुदतीचें देणें आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. परकीय चलनांत पैसे फेडावयाचे असतात अशा प्रकरणीं तर ही जोखीम विशेषच आहे. परकीय चलनांत द्यावयाची रक्कम १ एप्रिल १९५८ रोजीं अंदाजें ७५० कोटि रुपये होत असून त्यांपैकी ११० कोटि रुपये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या राहिलेल्या मुदतींत द्यावयाचे आहेत. ३४० कोटि रु. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आणि बाकीची रक्कम त्यानंतरच्या काळांत परत करावयाची आहे. अर्थात् भविष्यकाळांत या कर्जफेडीची आपणांस प्रथम सोय करावी लागेल. हें काम प्रचंड स्वरूपाचें आहे, तथापि अतिशय उत्पादक अशा रीतीनें आपण हा पैसा व इतर संपत्ति गुंतविल्यास ही गोष्ट अशक्य नाहीं.


सस्तु साहित्यवर्धक कार्यालयाचें
आगामी प्रकाशन

**मधुमालतीनुं सौंदर्य**

मूळ लेखक :
श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
गुजराती अनुवादकः
प्रा. शशिन् ओझा, एम्. ए.
प्रस्तावना :
लेडी प्रेमलीलाबेन ठाकरसी
उप-कुलगुरु, श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ.

## बैलांच्या साहाय्यानें वीज व पाणीपुरवठा

### "पण बैल कुठें आहेत ?"

दिल्लीजवळील खानपूर ह्या खेड्यांत वीज-उत्पादनासाठी व पाणी वर खेचण्यासाठी बैलांचा वापर करण्याचा प्रयोग चालू आहे, त्याची माहिती "अर्थ" मध्यें आलीच आहे. बैलांच्या साहाय्यानें ४½ कि. वॅ. वीज उत्पादन करतां येते. ही वीज खानपूरमधलि १५० घरें, रस्ते व एक लहान ग्रामीण उद्योग ह्यांना पुरते. बैल दर मिनिटास १५० गॅलन या प्रमाणांत पाणीहि खेचतात. हें पाणी शेत-जमीन भिजविण्यास व सबंध खेड्यास शुद्ध पाणी पुरविण्यास पुरेसें होतें. "पंप व वीज-उत्पादक यंत्र भारतांत उत्पादन केल्यास, १५,००० रुपयांत तें होऊं शकेल अशी अपेक्षा आहे. इंजिनिअर्सची आंखणी पूर्णपणें अंमलांत येईल. तेव्हां फक्त एकाच वर्षांत केवळ पंपामुळेंच यंत्राच्या किंमतीची परतफेड होऊं शकेल; कारण त्यामुळें वर्षांतून दोन किंवा तीनहि पिकें काढतां येतील" असें यंत्राचे सूत्रधार, श्री. जे स्टीव्हन्स, ह्यांचें म्हणणें आहे.

"बैलांचा भाव आतां सहाजीकच वाढला आहे; परंतु शेतीसाठी आणि वीजनिर्मितीसाठी आवश्यक तेवढे बैल उपलब्ध आहेत किंवा नाहींत, हा विचार करण्याजोगा प्रश्न आहे. बैलांच्या तुटवड्यामुळें शेतीचीं कामें पार पाडणें अवघड जातें, असा अनुभव आहे. वीजनिर्मितीसाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या आयातीबरोबर बैलांचीहि आयात करण्याची पाळी यावयाची !" असा अभिप्राय 'इंडियन फिनॅन्स' नें जरा खवचटपणें व्यक्त केला आहे.

---

### एप्रिल व मे महिन्यांत एकूण १६८ कंपन्यांची नोंद

एकोणिसशें छपन्नच्या कंपनी कायद्यानुसार निरनिराळ्या राज्यांत १९५८-५९ या वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत म्हणजे एप्रिल व मे मध्यें एकूण २८ कोटि रुपयांहून अधिक अधिकृत भांडवलाच्या नव्या १६८ कंपन्यांची नोंद झाली आहे.

मध्यवर्ती व्यापार व उद्योग खात्याच्या कंपनी कायदा कारभार विभागाकडे आलेल्या अहवालानुसार, या १६८ कंपन्यांपैकी ६ कंपन्या सरकारी असून त्यांचें अधिकृत भांडवल १४·६ कोटि रुपये आहे. बाकीच्या १६२ कंपन्या खाजगी असून त्यांचे अधिकृत भांडवल १३·६ कोटि रुपये आहे.

उपरोक्त ६ कंपन्यांपैकीं २ कोटि रु. अधिकृत भांडवलाची पार्क डेव्हिस इंडिया ( प्रा. ) लि. व २ कोटी रु. अधिकृत भांडवलाची रोचे प्रॉडक्ट्स् ( प्रा. ) लि. या दोन कंपन्या मुंबई राज्यांत सुरू झाल्या आहेत. खाजगी कंपन्यांपैकीं १० कोटि रु. अधिकृत भांडवलाची बरोडा रेयॉन कॉर्पोरेशन लि. व १ कोटी रु. अधिकृत भांडवलाची स्पेशल स्टील्स ( प्रा. ) लि. या दोन कंपन्याहि मुंबई राज्यांतच सुरू झाल्या आहेत.

---

### डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनचे नवे अध्यक्ष व उपाध्यक्ष

गोदावरी शुगर मिल्स लि. चे श्री. एस. के. सोमय्या व बेलापूर कंपनी लि. चे श्री. एफ. एडवर्डस ह्यांची दि डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनचे १९५८ सालचे अनुक्रमें अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून निवडणूक झाली आहे.


सुरक्षित गुंतवणूक तथापि भरपूर मोबदला

# दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव

मुंबई व म्हैसूर राज्यांत एकूण २९ शाखा

आमच्या ठेवीदारांसहि योग्य मोबदला मिळावा म्हणून आम्ही ठेवींवरील व्याजाचे दर खालीलप्रमाणें वाढविले आहेत.

★ द. द. शें. ४ टक्के व्याजाच्या त्रैवार्षिक कॅशसर्टिफिकेटसची नवीन योजना—

★ मुदत ठेवी—

| | | | |
|---|---|---|---|
| ६ महिने | द. द. शें. | ३ | टक्के |
| १ वर्ष | ,, | ३। | ,, |
| २ वर्षें | ,, | ३॥ | ,, |
| ३ वर्षें | ,, | ३॥। | ,, |
| ४ वर्षें | ,, | ४ | ,, |

★ सेव्हिंग्ज खातें द. द. शें. २ टक्के

होम सेव्हिंग्ज खातें ,, २॥ ,,

★ आकर्षक मोबदल्याची मासिक समान हप्त्यांची क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खातीं १, २, ३ व ४ वर्षांचे मुदतीनें स्वीकारलीं जातात.

—बँकेचें स्थैर्य व प्रगति दर्शविणारे आंकडे—

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. सहा लाख |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ,, सवातीन लाख |
| एकूण ठेवी | ,, एक कोटी, चौदा लाखांचेवर |

विशेष माहितीसाठी आमच्या कोणत्याहि शाखेंत चौकशी करा.

गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.



स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. रा. सा. म. ना. ढोबळे, ( अध्यक्ष )

श्री. गे. गो. ढोले, ( उपाध्यक्ष )

श्री. उ. भा. तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )

श्री. म. वा. बेंडे, ( ऑ. खजिनदार )

श्री. म. मा. वामन डायरेक्टर

श्री. गे. ल. पाटील नलवडे ,,

श्री. आ. पां. ढोरे ,,

श्री. ज्ञा. मा. मनसुख ,,

श्री. म. रा. नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

## चित्रवाणीचें केंद्र उभारण्याची शक्यता

भारतांत चित्रवाणीचें केंद्र उभारलें जाण्याची शक्यता अद्याप खूपच दूर आहे. तथापि ह्या बाबतींतील शक्याशक्यता अजमावण्यासाठी नभोवाणी खात्यानें एक तात्पुरतें केंद्र दिल्ली येथें चालू केलें आहे. दूर चित्रवाणीचें संशोधन केंद्र म्हणून आणि तंत्रज्ञांना शिक्षण देण्यासाठी म्हणून त्याचा उपयोग करण्यांत येत आहे. नभोवाणी खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ह्या कामासाठी सहा सेट्स देण्यांत आलेले असून केंद्रातर्फे क्षेपण होणाऱ्या कार्यक्रमांचा दर्जा बराच चांगला आहे असें समजतें. ह्या यशामुळें उत्तेजित होऊन दिल्ली येथें येत्या ऑक्टोबर महिन्यांत दूर चित्रवाणीचें नियमित केंद्र चालू करण्यांत येणार आहे. प्रथम ह्या केंद्रावरून दिल्लीच्या आसपास असलेल्या सामूहिक विकास योजनेंतील खेड्यांना शैक्षणिक कार्यक्रम क्षेपित करण्यांत येतील. कार्यक्रमांचें ग्रहण करण्यासाठी जें साहित्य लागेल तें संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या सांस्कृतिक व शास्त्रीय शाखेकडून मिळण्याचा संभव आहे. दूर चित्रवाणीच्या सेटची किंमत जबर असल्यानें आणि सध्यां तरी परदेशी चलनाची टंचाई असल्यामुळें कायम स्वरूपाचें केंद्र उभारलें जाण्याची शक्यता बेताचीच आहे. साधारण बऱ्यापैकीं सेट घ्यावयाचा झाल्यास त्यासाठी १,००० ते १,५०० रुपये मोजावे लागतील. अर्थातच भारतांत इतकी मोठी किंमत देऊं शकणारे लोक फारच थोडे आहेत. शिवाय, हीं ग्रहणयंत्रें परदेशांकडून आयात करावीं लागतील. त्याचप्रमाणें त्यांची दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी लागणारा खर्चहि मोठा असतो. भारताच्या सध्यांच्या आर्थिक परिस्थितींत दूर चित्रवाणीचें केंद्र उभारणें ही चैनीचीच बाब ठरणार आहे. देशांतील अनेक तांतडीच्या विकासकार्यांना लागणारें परदेशी चलन अनुपलब्ध असतांना दूर चित्रवाणीसारख्या बाबीसाठी तें मिळण्याची शक्यता नाहींच.

## तंबाखूच्या निर्यातीचा उच्चांक

टोबॅको एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलचे अध्यक्ष श्री. के. रंगास्वामी ह्यांनी असा अंदाज व्यक्त केला आहे कीं, चालू वर्षी भारत असंस्कारित तंबाखूच्या निर्यातीचा उच्चांक गाठील. तंबाखूच्या निर्यात व्यापाराविषयीं वृत्तपत्रप्रतिनिधींशी बोलतांना ते म्हणाले कीं, ह्या वर्षी तंबाखूची निर्यात गेल्या वर्षापेक्षा २ कोटी पौंडांनीं अधिक होईल. तंबाखूची एकूण निर्यात १० कोटी पौंड होईल असा अंदाज आहे. अर्थातच, त्या प्रमाणांत परदेशीय चलनाच्या प्राप्तींतही वाढ होईल. तंबाखूच्या निर्यातीमुळें भारताला दरसाल सरासरी १२ कोटी रुपयांचें परदेशीय चलन मिळतें. पण, ह्यावर्षी सुमारें १४ ते १५ कोटी रुपयांपर्यंत परदेशीय चलन मिळण्याची शक्यता आहे. निर्यात वाढविण्यासाठी कौन्सिलनें जे प्रयत्न केले त्यामुळें आणि तंबाखूचा दर्जा चांगला असल्यामुळें ही प्रगति शक्य झाली आहे. गेल्या वर्षी भारताच्या परदेशी गिऱ्हाइकांच्या यादींतून चीननें स्वतःला वगळलें होतें. पण चालू वर्षी चीनकडून २ कोटी पौंड तंबाखूची मागणी पुन्हां आली आहे. शिवाय ब्रिटनमध्यें तयार करण्यांत घेणाऱ्या सिगारेट्ससाठी पूर्वीपेक्षां अधिक प्रमाणांत भारताच्या तंबाखूचा वापर करण्यांत येऊं लागला आहे. चांगल्या दर्जाची तंबाखू निर्यात करण्यासाठी उत्पादन करण्यांत यावी म्हणून सरकार कांहीं उपाय करणार आहे:—(१) तंबाखूवरील अबकारी कर रद्द करणें, (२) तंबाखूच्या निर्यातीसाठी तिच्यावरील वहातुकीचे दर कमी करणें आणि (३) तंबाखूसाठी लागणाऱ्या खताच्या आयातीला सवलती देणें. भारतांत दरसाल सर्व प्रकारची मिळून ६८·५ कोटी पौंड तंबाखू पिकते. त्यांपैकी २० टक्के 'व्हर्जिनिआ' जातीची असते व तिला ब्रिटनमध्यें चांगली मागणी येते.

## शिवणकामाच्या यंत्रांचें उत्पादनांत १९५७ मध्यें २५ टक्क्यांनीं वाढ

सन १९५६ मधील उत्पादनाशी तुलना करतां १९५७ मध्यें शिवणकामाच्या यंत्रांच्या उत्पादनांत २५ टक्क्यांनीं वाढ झाली. १९५६ मध्यें १·३० लक्ष यंत्रें तयार झालीं तर १९५७ मध्यें १·६७ लक्ष यंत्रांचें उत्पादन झालें. या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत ६५,००० यंत्रें बनविण्यांत आलीं आहेत. देशांत शिवणकामाचीं यंत्रें तयार करणारे छोट्या क्षेत्रांत ३५ आणि मोठ्या क्षेत्रांत ७ उत्पादक आहेत. या ३५ छोट्या कारखान्यांपैकीं १४ पंजाबांत, ९ दिल्लींत, ४ राजस्थानांत, ३ उत्तर प्रदेशांत, २ जम्मू व काश्मीर राज्यांत आणि मुंबई, मध्यप्रदेश आणि आंध्र प्रदेश या राज्यांत प्रत्येकीं एक, याप्रमाणें कारखाने आहेत. सात मोठ्या कारखान्यांपैकीं प. बंगाल आणि पंजाब या राज्यांत प्रत्येकीं तीन आणि सातवा दिल्लींत आहे.

## लोकसंख्येची कमालीची वाढ


जगांतील लोकसंख्या २५० कोटीपर्यंत पोचायला २,००,००० वर्षें लागलीं; पण त्यांत २००. कोटींची भर घालायला अवघीं ३० वर्षें पुरतील! विसाव्या शतकाचे अखेरीस जगाची लोकसंख्या ६०० ते ७०० कोटीपर्यंत पोचलेली असेल. १९१४ हें वर्ष जवळ वाटतें. २,००० हें वर्ष त्यापेक्षा दूर नाहीं. लोकसंख्येच्या दृष्टीनें युरोपचें महत्त्व कमी होऊं लागलें आहे; आशियाचें वाढत आहे. चालू शतकाच्या प्रारंभीं युरोपिअन व एशियन ह्यांचें प्रमाण १ : २ असें होतें; शतकाचे अखेरिस तें १ : ४ असें होईल. अन्नपुरवठा त्या प्रमाणांत वाढला नाहीं, तर मृत्युसंख्येचें प्रमाण वाढून मानवी जीवनाची पातळी उतरल्याविना रहाणार नाहीं.

## लाः इं. कॉर्पोरेशननें उतरविलेले विमे

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें १९५७ मध्यें २८१·९० कोटि रुपयांचें नवें काम पुरें केलें. १९५३ मध्यें १६९ कोटि रुपयांचें, १९५४ मध्यें २५४ कोटि रुपयांचें, १९५५ मध्यें २५८ कोटि रुपयांचें व १९५६ मध्यें २०० कोटि रुपयांचें काम पुरें झालें होतें. जानेवारी, १९५८ ते जून, १९५८ ह्या सहामाहींत कॉर्पोरेशननें ९९·९१ कोटि रुपयांचें काम पुरें केलें; १९५७ च्या पहिल्या सहामाहींतील कामाचा आंकडा ९४·४९ कोटि रु. होता. विम्याचें काम वर्षअखेरीसच नेहमीं ज्यास्त होतें. उदाहरणार्थ, १९५७ च्या डिसेंबरांत ८० कोटींचें काम झालें होतें.

## दि नासिक पीपल्स को. बँकेचा ३५ वा वाढदिवस

पीपल्स को. बँक, नासिक,चा ३५ वा वाढदिवस मुंबई राज्याचे सहकार मंत्री श्री. टी. एस्. भारदे, बी. ए., एलएल. बी. यांचे अध्यक्षतेखालीं गुरुवार दिनांक २८–८–५६ रोजीं सायंकाळीं ठीक ६–३० वाजतां नासिक म्युनिसिपल हॉलमध्यें साजरा होणार आहे.



## बाबा, तुम्ही डॉक्टर कांहो नाहीं झालांत?...

"डॉक्टर कां नाहीं झालो?"... २० वर्षापूर्वीचा प्रसंग आठवतो मला. शिकायची पुष्कळ इच्छा होती आणि इंटरला मार्कस् पण चांगले मिळाले होते. पण पैसा कुठें होता! त्यामुळें बरोबरीची मुलं डॉक्टर, इंजिनिअर झाली अन् मला मात्र थोड्या पगारांची नोकरी तावडतोब पत्करावी लागली. पण बेटा, तुझ्या जन्मापासूनच मी एक शिक्षणाची विमा पॉलिसी घेतली आहे. आतां तुझ्या शिक्षणांत कुठलीहि अडचण येणार नाहीं. खूप शीक अन् खूप मोठा हो!

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

सेंट्रल ऑफिस: "जीवन केंद्र" जमशेटजी टाटा रोड, मुंबई-१

PRATIBHA/LIC/2

# * सारस्वत कोऑपरेटिव्ह बँक लि. *

स्थापना १९१८ ] सारस्वत बँक-गृह, मुंबई ४. [ टेलिफोन २७०९४

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | :: | :: | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | :: | :: | रु. ७,९७,८४० |
| रिझर्व्ह फंड | :: | :: | रु. ८,३४,७०० |
| ठेवी | :: | :: | रु. १,७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | :: | :: | रु. १,९९,६९,००० |

बँकेच्या शाखा: फोर्ट, दादर, वरळी, माहिम, पुणें, बेळगांव.

महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, गिरगांव, मुंबई ४.

## दि फलटण बँक लिमिटेड, फलटण

(१९५७ अखेरचा डायरेक्टरांचा अहवाल)

आतांपर्यंत बँकेची रिझर्व बँक ऑफ इंडियाकडून तीन वेळा तपासणी झाली असून त्यांच्या रिपोर्टाप्रमाणें तजवीजी केल्या जात असून रिटर्नस् वेळोवेळीं पाठविलीं जात आहेत.

अहवालाचे वर्षी बँकेस निव्वळ नफा रुपये १,१६९·४० नये पैसे इतका झाला असून त्याची विभागणी खालीलप्रमाणें करावी अशी संचालक मंडळाची शिफारस आहे.

| | रुपये |
|---|---|
| (१) बँकिंग कंपनीच्या कायद्याचें कलम १७ प्रमाणें रिझर्व फंडास | २५४–०० |
| (२) इन्कमटॅक्स तरतूद | ५१४–८० |
| (३) संशयित व बुडीत कर्जे तरतूद | ४००–६० |
| एकूण रुपये | १,१६९–४० |

गेल्या दोन–तीन वर्षांच्या परिस्थितींत बराच फरक पडला असून पूर्वीच्या नुकसानीच्या बाबी बहुतेक नाहींशा झाल्या असल्याकारणानें आतांपावेतोंचा रिझर्व फंड कायम सुरक्षित झाला आहे, व ह्या वर्षी जरी शक्य नसलें तरी पुढील वर्षी भागिदारांना निश्चितपणें डिव्हिडंड देतां येण्यासारखी परिस्थिति निर्माण होत आहे. बँकेच्या उत्पन्नाचें व व्यवहाराचें प्रमाण दिवसेंदिवस चांगलेंच वाढत आहे.

बँकेची उत्तरोत्तर प्रगति होत आहे. बँकेच्या ठेवीमध्यें व व्यवहारामध्यें गतवर्षीपेक्षा हल्लीं जवळजवळ दीडपट वाढ झाली आहे. तथापि बँकेस रीतसर लायसेन्स मिळविण्यासाठी ह्यापेक्षाहि वाढ होणें जरूर आहे व त्यासाठी सर्वांनीं एकजुटीनें प्रयत्न व सहकार्य करावें आणि ही संस्था सर्वांस अधिक उपयुक्त व्हावी, तिच्या मूळ उद्देशानुसार तिच्या साहाय्यानें फलटणमधील व्यापार दिवसेंदिवस वाढावा, निरनिराळ्या प्रकारचे उद्योगधंदे निर्माण करतां यावेत आणि त्यायोगें ह्या शहराची व तालुक्याची उत्तरोत्तर भरभराट व्हावी अशी संचालक मंडळाची अपेक्षा आहे. बँकेचा व्यवहार मोठ्या प्रमाणांत वाढून उत्पन्नांत वाढ होणें हें ठेवीदार, कर्जदार व भागीदार यांच्याच सहकार्यावर संपूर्णपणें अवलंबून आहे. श्रीमंत राजेसाहेब मालोजीराव नाईक निंबाळकर व यांची कुटुंबीय मंडळी यांच्याकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल बँक त्यांची फार ऋणी आहे. तसेंच बँकेच्या व्यवहारामध्यें मोठ्या प्रमाणांत वाढ झाली, त्या कामीं दि फलटण एज्युकेशन सोसायटीचा तिच्या स्थापनेपासून बराच हातभार आहे हें येथें नमूद करावेंसें वाटतें. बँकेची वार्षिक सभा दि. १५–९–५८ रोजीं भरणार आहे.

**युगोस्लाव्हिआची मागणी** —युगोस्लाव्हिआचें सरकार व रशिआ ह्यांच्यांत राजकीय वेबनाव झाल्यामुळें रशिआने युगोस्लाव्हिआला द्यावयाची आर्थिक मदत तहकूब केली आहे. ह्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी युगोस्लाव्हिआ आतां अमेरिका, ब्रिटन इत्यादि पाश्चात्य देशांपासून मदत मिळविण्याच्या खटपटींत आहे

## भारतांतील परकीय भांडवलांत वाढ

भारतांत सध्यां ६५० कोटि रुपये परकीय भांडवल गुंतलें असल्याचें अनधिकृत रीत्या सांगण्यांत येतें. हा आंकडा १९५५ अखेरच्या आंकड्यापेक्षा १७० कोटि रुपयांनीं जास्त आहे.

१९१४ मध्यें भारतांत सुमारें ४५० कोटि रुपये परकीय भांडवल गुंतविण्यांत आलें होतें. दि फायनान्शियल टाइम्सनें (लंडन) १९३० मध्यें हा आंकडा ७० कोटि पौंड म्हणजे सुमारें ९३३ कोटि रु. असावा असा अंदाज व्यक्त केला होता, तर सर रॉबर्ट किंडरस्ले यांनीं तो या वर्षात ६११ कोटि रु. आणि दि (ब्रिटिश) असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स ऑफ इंडिया यांनीं हा आंकडा १९३१ मध्यें १३३३ कोटि रु. असल्याचें म्हटलें होतें. ब्रिटिशांच्या एकूण परकीय भांडवलापैकीं १० ते २० टक्के भांडवल भारतांत गुंतविण्यांत आलें होतें.

वर दिलेले आंकडे म्हणजे साधारण अंदाज होते. तथापि रिझर्व्ह बँकेने १९४८ मध्यें भारताच्या परकीय देण्याघेण्याची आंकडेवारी गोळा करण्याचें काम हातीं घेतल्यावर यासंबंधीची निश्चित माहिती उपलब्ध झाली. या अहवालावरून सरकारी क्षेत्रांतील देणीं वगळतां जून, १९४८ अखेर या देशांत २८८ कोटी रु. परकीय भांडवल गुंतलें असल्याचें दिसून येतें. तथापि रिझर्व्ह बँकेनें प्रसृत केलेल्या प्रश्नावलीस कांहीं व्यापारी संस्थांनीं उत्तरें न पाठविल्यानें हा अहवालहि अपूर्णच होता.

तदनंतर, डिसेंबर १९५३ अखेर व डिसेंबर १९५५ अखेर असे आणखी दोन अहवाल तयार करण्यांत आले आहेत. पुढील तक्त्यांत भारतांतील निरनिराळ्या उद्योगधंद्यांत गुंतलेल्या परकीय भांडवलाची आंकडेवारी देण्यांत आली आहे.

(आंकडे कोटी रुपयांचे)

| | जून १९४८ अखेर | डिसें. १९५३ अखेर | डिसें. १९५५ अखेर |
|---|---|---|---|
| १. उत्पादक धंदे | ७२·० | १२५·७ | १६३·३ |
| २. व्यापार | ६४·४ | ९४·८ | १०२·३ |
| ३. सार्वजनिक उपयुक्ततेचे धंदे व वाहतूक | ३१·२ | ५०·५ | ५३·१ |
| ४. खाणधंदा | ११·५ | ८·४ | ९·६ |
| ५. आर्थिक विभाग | | | |
| (अ) बँकिंग | २१·७ | १६·२ | २०·२ |
| (ब) इतर क्षेत्र | ६·९ | १४·७ | १९·१ |
| ६. मळे | ५२·३ | ७१·५ | ८७·२ |
| ७. संकीर्ण | १७·७ | २७·७ | २५·९ |
| एकूण भांडवल गुंतवणूक | २८७·७ | ४१९·५ | ४८०·[illegible] |

**पश्चिम जर्मनीची आर्थिक मदत** —भारताला कर्जे देणाऱ्या देशांची जी परिषद वॉशिंग्टन येथें भरणार आहे तिला पश्चिम जर्मन सरकारचें प्रतिनिधिमंडळ हजर राहणार आहे. पश्चिम जर्मनीकडून भारताला ४० ते ५० कोटी मार्कसचें कर्ज मिळण्याची शक्यता आहे. पण नक्की आंकडा परिषदेंतच ठरविण्यांत येईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर प. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.